नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 27/03/2021 (शनिवार)
(दुपार)

---

## विनयभंग

पो.स्टे. मौदा :– दि. 26/03/2021 चे 19:00 वा. चे दरम्यान वय 35 वर्ष पीडित/फिर्यादी हिचे पती हे किसना कामडीसह आरोपी नामे– कुलदीप मेश्राम, रा. अजनगांव याच्या विरोधात आठ दिवसा पुर्वी रिपोर्ट देण्याकरीता गेले होते. याकारणावरून आरोपी दारू पिउन पीडितेला अश्लील शिवीगाळ करून तिच्या मनास लज्जा उतपन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. यानंतर फिर्यादीचा दिर हा फिर्यादीस समजविण्याकरीता आला असता आरोपीने त्याला सुध्दा अश्लील शब्दात शिवीगाळ केली व लोखंडी सळाखीने फिर्यादीचे दिराला हातावर मारून जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ), 324, 294, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ ठाकुर मो.नं 7083151993 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर